# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# त्रिवेणीनगर चौकात सिग्नल यंत्रणा नसल्याने अपघाताचा धोका

## आरटीओ पोलिस अन् महापालिका प्रशासनाने समन्वयातून व्यवस्था तत्काळ करावी

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहतूक कोंडीचा हॉटस्पॉट म्हणून हा त्रिवेणीनगर चौक म्हणून ओळखला जात होता. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिकेने अतिक्रमण हटवून रस्ता रूंदीकरण केले. मात्र तीन महिन्यानंतरही चौकात सिग्नल व्यवस्था न उभारल्याने अस्ताव्यस्त वाहतूक होत आहे. चौकात चारही दिशेने वाहने समोरासमोर येत असल्याने वाहतूक कोंडीत अजून जास्तीची भर पडते आहे. त्यामुळे अपघाताचा धोकाही निर्माण होत आहे. महापालिका प्रशासन आणि आरटीओ पोलिस यांनी समन्वयातून ही व्यवस्था उभारून अपघाताचा धोका टाळावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

तळवडे मधून दररोज हजारो चाकरमानी कामानिमित्त शहरात येतात. तसेच चाकण-भोसरी या दोन्ही 'एमआयडीसीं'ना जोडणारा मार्ग असल्यामुळे येथून मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक होते. शहरात येण्यासाठी हा महत्त्वाचा मार्ग असल्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून हा रस्ता वाहतूक कोंडीमुळे चर्चेत आला आहे. या मार्गावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिका प्रशासनाने येथील अतिक्रमण काढून रस्ता रुंदीकरणाचा निर्णय घेतला होता. गेल्या तीन महिन्यांपूर्वी या मार्गावरील अतिक्रमण काढून रस्ता रुंदीकरण केले. डांबरीकरणाचे काम देखील पूर्ण केले. त्यामुळे त्रिवेणी चौकाने मोकळा श्वास



घेतला. मात्र आता या चौकात सिग्नल यंत्रणा नसल्यामुळे वाहन चालक आडवी तिडवी वाहने चालवत आहेत.

तळवडेकडून निगडीच्या दिशेने, भोसरीकडून भक्ती-शक्ती चौकाकडे आणि भक्ती-शक्ती चौकातून भोसरीकडे जाणारी वाहने समोरासमोर येत आहेत. त्यामुळे चौकात वाहतूक कोंडी होत आहे. रस्ता रुंदीकरण केल्यामुळे काहीसा दिलासा मिळाला असला तरी आता सिग्नल यंत्रणा नसल्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे वाहनचालक व स्थानिक नागरिक त्रस्त आहेत. यामुळे वाहतूक प्रशासनाने येथे सिग्नल यंत्रणा उभारावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



"त्रिवेणीनगर चौकातील वाहतूक कोंडीची समस्या काही प्रमाणात कमी झाली असली तरी सिग्नल नसल्यामुळे सर्व वाहने चौकात एकत्र येतात. त्यामुळे अवजड वाहने थेट अंगावर येण्याची भीती वाटते. अपघातही होण्याचा धोका आहे. शक्यतो सकाळी आणि सायंकाळच्या वेळी ही समस्या मोठ्या प्रमाणात येते आहे.

**- शरद भालेकर, तळवडे ग्रामस्थ.**



"त्रिवेणीनगर चौकात मोठी जागा आहे. एवढा मोठा चौक, परिसर असून, जागेचा वापर योग्य पध्दतीने केलेला नाही. महापालिकेने काम करत असताना डिझाईन व्यवस्थित न केल्याने हा चौक अडचणीचा होता आहे. कामे अपूर्ण आहेत. टॉवरलाईन, ज्योतिबानगर, गणेशनगर, तळवडे गावठाण या गर्दीच्या ठिकाणी पोलिस यंत्रणा वाढवली पाहिजे. आम्ही अनेकदा मागणीही केली आहे. महापालिका प्रशासनाने व आरटीओ प्रशासनाने तत्काळ सिग्न यंत्रणा उभारावी. तसेच आरटीओने पोलिस यंत्रणा उभारावी.

**- शांताराम बापू भालेकर, तळवडे ग्रामस्थ.**

# कर्ज हवंय, पण रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी!

## पिंपरी चिंचवड महापालिकेला उपरोधिक टोला मारत खड्डे कायमस्वरूपी बुजविण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

'कर्ज हवंय, मात्र ते रस्त्यावरील खड्डे बुजवायला !' असे कोणी म्हटले; तर विश्वास बसणार नाही. मात्र, भोसरीतील एका अवलिया कामगाराने भोसरीतील चौकात उभे राहून रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी कर्ज हवंय, असा पिंपरी चिंचवड महापालिकेला उपरोधिक टोला मारत खड्डे कायमस्वरुपी बुजविण्याची मागणी केली. त्यामुळे भोसरी परिसरात त्याचीच चर्चा दिवसभर सुरू होती.

पावसाळ्यामुळे शहरातील काही रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहन चालकांना अशा रस्त्यावरून जाताना कसरत करावी लागत आहे. खड्डे बुजविण्याच्या कामात कुचराई केल्यामुळे महापालिका प्रशासनाने नुकतेच २६ कनिष्ठ अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. त्या पार्श्वभूमीवर, कामगार ऋषिकेश पाचणकर यांनी चक्क चौकात उभे राहून रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी कर्ज हवे असल्याचा फलक अंगावर घालून महापालिकेच्या ढिसाळ कारभारावर ताशेरे ओढले. पाचणकर हे कामाला जाण्यापूर्वी आणि कामावरून घरी जाताना




चौका-चौकात थांबून खड्डे बुजविण्यासाठी अनोख्या पद्धतीने महापालिकेकडे पाठपुरावा करताना दिसतात.

गेल्या दोन महिन्यांपासून ते पुणे, भोसरी, चाकण, चऱ्होली आदी भागांतील रस्त्यावर थांबून जनजागृती करत आहेत. खड्डयांची दुरुस्ती तुम्ही तात्पुरती करता मग आम्ही कर कायमस्वरूपी का भरायचा ? असा रोकडा सवालही ते फलकाद्वारे करत आहेत. त्यांच्या या अनोख्या पद्धतीच्या मागणीला वाहन चालक आणि नागरिकांद्वारे मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत आहे. त्याचप्रमाणे वाहन चालक, नागरिक त्यांच्याबरोबर सेल्फीही काढत आहेत. चऱ्होलीतील अलंकापुरम ते खडी मशीन रस्त्यावर शुक्रवारी (ता. ११) रस्त्यावर विखुरलेल्या खडीवरून दुचाकी घसरल्याने पाचणकर यांना दुखापत झाली असल्याचे त्यांनी सांगितले. रस्त्याच्या दुरवस्थेबद्दल त्यांनी संतापही व्यक्त केला.

"आपण शासनाकडे मोठ्या प्रमाणात कर भरतो. कर भरूनही खड्डेमय रस्त्याने प्रवास करावा लागतो. खड्डयांमुळे वाहन चालकांना अपघातही होतो. महापालिकेद्वारे रस्त्यावरील खड्डे भरले जातात. मात्र ते निकृष्ट पद्धतीने भरले जात असल्याने रस्त्यांवर पुन्हा खड्डे पडतात. त्यामुळे नागरिकांच्या कररुपी पैशाचा हा अपव्यय होत आहे. महापालिकेने रस्त्यांवरील खड्डयांची तात्पुरती डागडुजी न करता ते कायमस्वरुपी भरण्यासाठी मी अनोख्या पद्धतीने आंदोलन करत आहे.

**- ऋषीकेश पाचणकर, कामगार, भोसरी.**

# विमानतळ रस्त्यावरील कोंडी फोडण्यासाठी एकत्रित कारवाई

## आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील रस्त्यांवरील अतिक्रमण; महापालिका आयुक्तांचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील रस्त्यांवरील अतिक्रमण आणि रस्त्याच्या दुतर्फा उभ्या केल्या जाणाऱ्या (पार्क) वाहनांमुळे विमान प्रवाशांना फटका बसत असून, वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी रस्त्यावरील अतिक्रमण केलेल्यांवर कारवाई करून रस्ता रुंदीकरणाबाबत कार्यवाही करावी, असे पत्र महानगरपालिकेला पाठवले आहे, तर विश्रांतवाडीकडून विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव विचाराधीन असून, वाहतूक पोलिसांच्या मदतीने एकत्रित कार्यवाहीची मोहीम हाती घेण्यात येईल, असे आश्वासन महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले.



पुणे विमानतळावरून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू असून प्रवाशांकडून हवाई प्रवासाला पसंती दिली जात आहे. नियोजित विमानाच्या आरक्षणानुसार प्रवासी विमानतळापर्यंत जाण्यासाठी दोन तास अगोदर प्रवास सुरू केला, तरी विमानतळावर पोहचण्यासाठी त्यांना अडथळे पार करत जावे लागत आहे. परिसरात एरोमॉल, शैक्षणिक संस्था आणि मोठ्या संख्येने निवासी इमारती, पंचतारांकित हॉटेल असल्याने या मार्गावर वाहनांची गर्दी वाढली आहे.

अनेक कॅबचालक रस्त्यालगत उभे राहिल्याने वाहतूक मंद गतीने सुरू असते. तसेच, विश्रांतवाडी रस्त्यावर खाद्यपदार्थ, उपाहारगृह आणि पथारीवाल्यांची अतिक्रमणे वाढली असून, विमानतळ परिसरातील रस्ता अरूंद झाला आहे.

'या परिसरातील वाहतूक कोंडी ही नियमित बाब झाली आहे. नियोजित विमान प्रवास करताना तिकीट आणि प्रवासी साहित्य, पिशव्या तपासणी, बोर्डिंग पास आणि इतर तपासणीसाठी दोन तास अगोदर पोहोचणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रवासी खूप आधी घरातून निघाले, तरी मंद वाहतूक, कोंडी या समस्यांमुळे विमानतळापर्यंत पोहचणे जिकिरीचे ठरत आहे,' अशी माहिती विमान प्रवासी दिनेश पाटील यांनी दिली.

> विश्रांतवाडी ते विमानतळ रस्त्यालगत 'नर्सरी'च्या व्यापाऱ्यांनी मोठे अतिक्रमण केले आहे. त्यामुळे हा रस्ता अरूंद झाला असून, वाहनांना अडथळा होत आहे. त्यामुळे या नर्सरींवर आणि इतर छोट्या-मोठ्या अतिक्रमणधारकांवर कारवाई करून रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घ्यावे, असे पत्र महापालिकेला पाठविले आहे.
>
> **- रवींद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विमानतळ रस्ता वाहतूक विभाग.**

> पुणे विमानतळ परिसराकडे विश्रांतवाडीकडून जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच, येथील रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी वाहतूक पोलिसांच्या मदतीने एकत्रित कार्यवाहीची मोहीम हाती घेण्यात येईल.
>
> **- नवल किशोर राम, आयुक्त, महानगरपालिका, पुणे.**

# उद्योग क्षेत्रातून टॅक्स घेता, मग सुविधा का देत नाही?

## आमदार लांडगे यांची सभागृहाचे लक्ष वेधले; राज्यमंत्री मिसाळ यांचे एकत्रित बैठक घेण्याचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सोयी-सुविधांबाबत राज्य सरकार सर्व संबंधित विभागांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनामध्ये बैठक घेईल. औद्योगिक क्षेत्रातील वीज, रस्ते, ड्रेनेज, सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापन याबाबत कालबद्ध नियोजन करण्यात येईल, असे आश्वासन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

पिंपरी-चिंचवड शहरातील औद्योगिक क्षेत्राला रस्ते, वीज, ड्रेनेज, सांडपाणी व कचरा व्यवस्थापन याबाबत समस्यांचा सामना करावा लागतो. एमआयडीसी आणि महापालिका यांच्यातील अधिकारक्षेत्राच्या विसंवादामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार




महेश लांडगे यांनी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने राज्य सरकारचे लक्ष वेधले. त्याला राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सकारात्मक उत्तर दिले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहराची ओळख 'मिनी इंडिया' अशी आहे. उद्योग व्यावसायाच्या निमित्ताने आमच्या शहरात देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक वास्तव्य करतात. शहरात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या औद्योगिक कंपन्या आणि लघु उद्योग आहेत. महानगरपालिकेला औद्योगिक क्षेत्रातून मालमत्ताकरापोटी 3 हजार 470 औद्योगिक कंपन्यांमधून प्रतिवर्ष सुमारे 320 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. पण, महापालिका सक्षमपणे पायाभूत सोयी-सुविधा पुरवत नाही. आमच्या अधिकार क्षेत्रात येत नाही, असे उत्तर दिले जाते.

'एमआयडीसी'च्या आराखड्यात ड्रेनेज, सांडपाणी व्यवस्थापनाचा आराखडा नाही. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्याप कार्यान्वयीत झालेला नाही. वीज समस्या मोठ्या प्रमाणात आहे. रस्ते आणि सुविधांबाबत उद्योजकांनी चाकणमध्ये बैठक घेतली. मोठ्या प्रमाणात चाकणमध्ये गुंतवणूक होते आहे. पण, सुविधा त्या प्रमाणात सक्षम केल्या पाहिजेत. त्यासाठी महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी, महावितरण, प्रदूषण नियंत्रण मंडळ अशा सर्व संबंधित विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेण्यात यावी, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली.

> 'एमआयडीसी'मध्ये ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी या परिसराचा अमृत योजनेत समावेश केला आहे, अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सभागृहात दिली. रस्ते, वीज, ड्रेनेज, सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापनाबाबत महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी अशा सर्व विभागांची बैठक घेण्यात येणार आहे. यावर सकारात्मक कार्यवाही होईल, असा विश्वास आहे. औद्योगिक पट्यातील पायाभूत सोयी-सुविधा जबाबदारी निश्चित करणे आणि निधी उपलब्ध करणे यासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# बांगलादेशी घुसखोर ठरताहेत पोलिसांची डोकेदुखी

## लपून- छपून राहणारे हे परदेशी नागरिक आता बनावट कागदपत्रांद्वारे नागरिकत्वाचे हक्क मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांची वाढती संख्या पोलिसांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. लपून- छपून राहणारे हे परदेशी नागरिक आता बनावट कागदपत्रांद्वारे नागरिकत्वाचे हक्क मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. पोलिसांनी आतापर्यंत शहरातून तब्बल 47 बांगलादेशी आणि 4 रोहिंग्यांना अटक केली आहे. त्यापैकी 26 जणांना न्यायालयाकडून जामीन मिळाल्यामुळे ते पुन्हा समाजात मिसळले आहेत.

घुसखोरांना अटक केल्यानंतर त्यांच्या विरोधात भारतीय न्यायसंहिता, परकीय नागरिक कायदा आणि पासपोर्ट कायद्यानुसार गुन्हे दाखल केले जातात. त्यानंतर त्यांची नागरिकत्व पडताळणी केली जाते. त्यांच्या विरुद्धचे पुरावे गोळा करून न्यायालयीन प्रक्रियेत सादर केल्यानंतर डिपोर्टची प्रक्रिया सुरू होते; मात्र अलीकडील काळात अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयाकडून जामीन मंजूर होण्याचे प्रमाण वाढले आहे. पोलिस प्रशासनासाठी हे मोठे आव्हान ठरत आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये अटक केलेल्या 47 बांगलादेशी घुसखोरांपैकी केवळ एकाला कायदेशीर प्रक्रियेनुसार त्याच्या मूळ देशात डिपोर्ट करण्यात पोलिसांना यश आले आहे. उर्वरितांपैकी अनेकांना न्यायालयाने जामीन मंजूर केला असून, काहींच्या प्रकरणांमध्ये अद्याप कागदोपत्री प्रक्रिया सुरू आहे.

पोलिसांनी मोठ्या प्रयत्नाने अटक केलेल्या घुसखोरांना वेळेवर डिपोर्ट करता न आल्याने नाराजी व्यक्त होत आहे. कायदेशीर अडथळे, न्यायालयीन प्रक्रिया यामागची प्रमुख कारणे मानली जात आहेत.

बांगलादेशी घुसखोरांच्या वाढत्या संख्येमुळे सामाजिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. हे घुसखोर बनावट कागदपत्रांच्या आधारे मतदान ओळखपत्र, आधार कार्ड व रेशन कार्ड मिळवून सरकारी सुविधा घेत आहेत. यामुळे स्थानिक रहिवाशांच्या अधिकारांवर गदा येत असल्याचे मत व्यक्त होत आहे.




### खोटे जामीनदार सादर

» निगडी आणि एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत अटक करण्यात आलेल्या काही बांगलादेशी घुसखोरांनी न्यायालयातून जामीन मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रांचा आधार घेतल्याचे समोर आले आहे. त्यांनी खोट्या जामीनदारांची माहिती सादर करून स्वतःची ओळख लपवत जामीन घेतल्याचे उघडकीस आले आहे.याप्रकरणी पिंपरी आणि एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यांत स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घुसखोरांना मदत करणाऱ्या व्यक्तींचादेखील शोध घेतला जात असून त्यांच्यावरही कारवाईची शक्यता आहे.

### विधानसभेत खोटे बोलणे...

» पिंपरी-चिंचवड शहरात अटक करण्यात आलेल्या बांगलादेशी व रोहिंग्या नागरिकांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बनवलेले एकूण 74 पासपोर्ट, 4 पॅनकार्ड आणि 4 मतदान ओळखपत्र मिळवल्याचे उघड झाले आहे या कागदपत्रांच्या आधारे ते देशात बेकायदा वास्तव्य करत होते. या प्रकारामुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेवर मोठा धोका निर्माण झाला होता. ही सर्व कागदपत्रे दहशतवाद विरोधी शाखेने (अढइ) संबंधित यंत्रणांकडे पाठवून रद्द करण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

### कडक उपाययोजना करणे गरजेचे

» घुसखोरांविरोधात पोलिसांकडून सुरू असलेली कारवाई निश्चितच कौतुकास्पद आहे; मात्र ही प्रक्रिया अधिक प्रभावी आणि वेगवान होण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने एकत्रितपणे ठोस योजना आखणे आवश्यक आहे, असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे. नागरिकत्व पडताळणी, न्यायालयीन प्रक्रिया आणि डिपोर्ट कारवाईला लागणार वेळ आणि अडथळे टाळण्यासाठी अधिक कडक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# महापालिका रुग्णालयांत ‘नो कॅशलेस’; रोखीने व्यवहारामुळे करावी लागतेय धावाधाव

## केसपेपर, उपचार बिलाची रक्कम जमा करताना रोख पैसे नसल्यास रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांना धावपळ करावी लागते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वच क्षेत्रात रोखीच्या व्यवहाराऐवजी कॅशलेस अर्थात ऑनलाईनद्वारे व्यवहार करण्यास प्राधान्य दिले जात आहे; मात्र पिंपरी-चिंचवड महापालिका रुग्णालये, दवाखान्यांत कॅशलेस व्यवहाराचा पर्याय प्रशासनाकडून दिला जात नाही.

केसपेपर, उपचार बिलाची रक्कम जमा करताना रोख पैसे नसल्यास रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांना धावपळ करावी लागते. पेपरलेस आणि स्मार्ट कारभाराचा दावा करणारे महापालिका प्रशासन रुग्णालयांत कॅशलेस बिलिंग कधी सुरू करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे

महापालिकेत एक एप्रिलपासून पेपरलेस कारभार सुरू झाला आहे. यापुढे प्रशासनात फाईल किंवा प्रस्ताव कागदोपत्री न स्वीकारण्याची भूमिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतली. वारंवार अडथळे येत असले, तरी संपूर्ण कारभार ई-प्रणालीवरून सुरू असल्याचा दावा प्रशासनाचा आहे.

परंतु, दुसरीकडे महापालिकेच्या रुग्णालये, दवाखान्यांमध्ये डिजिटल व्यवहार सुरू करणे प्रशासनाला जमलेले नाही. शहरातील नागरिकांसाठी महापालिकेची आठ मोठी रुग्णालये, 30 दवाखान्यांसह काही वैद्यकीय सुविधा अल्पदरात उपलब्ध आहेत. या रुग्णालय आणि दवाखान्यांमध्ये दररोज हजारो रुग्णांवर उपचार होतात.

मात्र, महापालिकेच्या सर्व रुग्णालयात रुग्णांच्या उपचारांचे पैसे ऑनलाईन स्वीकारण्याची व कॅशलेस व्यवहाराची सुविधा नाही. त्यामुळे अनेकवेळा रुग्णांकडे रोख पैसे नसल्याने वादावादीचे प्रसंग घडता. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून कॅशलेस आणि डिजिटल व्यवहार सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. तर, रुग्णालयात कॅशलेस व्यवहार सुरू करण्यावर चर्चा होते. परंतु, निर्णयाअभावी अनेक वर्षे हा प्रस्ताव प्रलंबित आहे.




### रोखीच्या व्यवहारामुळे गैरप्रकारास प्रोत्साहन

» महापालिकेच्या रुग्णालयातील या रोखीच्या व्यवहारामुळे गैरप्रकार घडतात. यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातच दोन वेळा रोखीच्या व्यवहारात अनियमितता झाल्याचे समोर आलेले आहे. या प्रकरणांत कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली. मात्र, महापालिका वैद्यकीय विभागाने सुधारणा केलेली नाही.

### कॅशलेस व्यवहाराबाबतचा नर्णय प्रलंबित

» आर्थिक व महापालिकेच्या व्यवहाराशी संबंधित बाब असल्याने ही व्यवहार प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. परंतु, तरीदेखील लेखा व इतर संबंधित विभागांसोबत चर्चा सुरू आहे. अद्याप कॅशलेस व्यवहार सुरू करण्याबाबत निर्णय झालेला नाही, असे महापालिकेचे मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

# प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या बळीराजाचा रोष उफाळला!

## पुणे- नाशिक ग्रीन फिल्ड औद्योगिक महामार्ग क्रमांक 11 या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांचा रोष आता उफाळून आला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे- नाशिक ग्रीन फिल्ड औद्योगिक महामार्ग क्रमांक 11 या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांचा रोष आता उफाळून आला आहे. आमदार सत्यजित तांबे यांना जर खरोखरच या महामार्गाचा कळवळा असेल तर त्यांनी आणि आणि नेत्यांनी स्वतः घेतलेल्या जमिनी, बाधित शेतकऱ्यांच्या नावावर करून दाखवाव्यात, अशी संतप्त प्रतिक्रिया महामार्ग शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख बाळासाहेब औटी यांनी दिली.

विधानपरिषदेमध्ये आमदार सत्यजित तांबे यांनी महामार्ग संदर्भातील तारांकित प्रश्न उपस्थित करून आंदोलन केलेल्या शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत असा थेट आरोप नागरिकांनी केला असून ही नेते स्वतःच्या स्वार्थासाठी बागायती भागातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना उखडून टाकण्याचा डाव रचला जात आहे, असा आरोप केला आहे.

विधानपरिषदेमध्ये सत्यजित तांबे यांनी पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाचे भूसंपादन सुरू असल्याचा दावा केला. तो साफ खोटा आहे. हा रस्ता अजून कुठेच भूसंपादन न करता फक्त सल्लागार कंपन्यांच्या अहवाला पुरता मर्यादित आहे. हे विधानसभेत खोटे बोलणे म्हणजे शेतकऱ्यांचा अपमान आहे पूर्वीचा पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्ग अस्तित्वात असताना नवीन औद्योगिक महामार्गाची गरज नाही. पण राजकीय नेते व ठेकेदार यांचे साटेलोटे तयार झाले आहे. सल्लागार कंपन्यांपासून ते जमिनीच्या खरेदी विक्री पर्यंत सगळं पॅकेजिंग सुरू आहे. राज्य शासनावर 28 हजार कोटीचे कर्ज करणारा पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाला समांतर असल्याने कोणासाठी उपयुक्त नसलेला हा औद्योगिक महामार्ग रद्द करून त्याचे राजपत्र सरकारने त्वरित काढावे, अशी मागणी बाळासाहेब औटी यांनी केले आहे.

अलीकडे मोठमोठ्या बांधकाम कंपन्या नव्या महामार्गाचे प्रस्ताव सुचवतात, मंत्र्यांच्या हातात हात घालून मोठेमोठे व्यवहार ठरतात आमदार मंडळांना विश्वास घेऊन विधिमंडळात विकासाच्या नावाखाली चर्चा घडवून आणल्या जातात. पण हे रस्ते कोणासाठी? त्याची वास्तविक गरज, उपयोगिता, आणि पर्यावरणीय परिणाम याचा सखोल मूल्यमापन न करता केवळ आर्थिक फायद्यासाठी हे प्रकल्प रेटले जात आहेत.

आमदार सत्यजित तांबे यांना जर खरोखरच या महामार्गाचा कळवळा असेल तर त्यांनी आणि आणि नेत्यांनी स्वतः घेतलेल्या जमिनी, बाधित शेतकऱ्यांच्या नावावर करून दाखवाव्यात, अशी संतप्त प्रतिक्रिया महामार्ग शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख बाळासाहेब औटी यांनी दिली.



### राजकीय नेते -ठेकेदारांचे साटेलोटे?

» पूर्वीचा पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्ग अस्तित्वात असताना नवीन औद्योगिक महामार्गाची गरज नाही. पण राजकीय नेते व ठेकेदार यांचे साटेलोटे तयार झाले आहे. सल्लागार कंपन्यांपासून ते जमिनीच्या खरेदी विक्री पर्यंत सगळं पॅकेजिंग सुरू आहे. राज्य शासनावर 28 हजार कोटीचे कर्ज करणारा पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाला समांतर असल्याने कोणासाठी उपयुक्त नसलेला हा औद्योगिक महामार्ग रद्द करून त्याचे राजपत्र सरकारने त्वरित काढावे, अशी मागणी बाळासाहेब औटी यांनी केले आहे.

### विधानसभेत खोटे बोलणे...

» विधानपरिषदेमध्ये सत्यजित तांबे यांनी पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाचे भूसंपादन सुरू असल्याचा दावा केला. तो साफ खोटा आहे. हा रस्ता अजून कुठेच भूसंपादन न करता फक्त सल्लागार कंपन्यांच्या अहवाला पुरता मर्यादित आहे. हे विधानसभेत खोटे बोलणे म्हणजे शेतकऱ्यांचा अपमान आहे आम्ही याचा तीव्र निषेध करतो, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

“ पुणे-नाशिक रेल्वे मार्ग हा सर्वसामान्यांसाठी शेतकऱ्यांसाठी, प्रवाशांसाठी एक जीवनदायींनी संधी ठरू शकला असता; मात्र जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोपच्या नावाखाली तो मार्ग रद्द करण्यात आला. त्यात हायस्पीड रेल्वे मार्गाची गरज असताना फक्त रस्त्या मार्गात करोडोचे मलिदा खाण्यासाठी हा खटाटोप चालू आहे.

- ज्ञानेश्वर शेळके, उपसरपंच राजुरी

# इंदापुरात 1300 हेक्टर उसाची लागवड

## तालुक्यात आडसाली लागवडींना वेग : सरी, आधुनिक पट्टा पद्धतीचा वापर

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यामध्ये आडसाली ऊस लागवडीला वेग आला आहे. यंदा तालुक्यात सर्वदूर पाऊस झाल्याने आजमितीला 1300 हेक्टर उसाची लागवड पूर्ण झाली असून पुढील 2 महिन्यांत उच्चांकी 10 हजार हेक्टर आडसाली ऊस लागवड होईल, असा अंदाज कृषी अधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. तालुक्यात मे महिन्यात झालेल्या पाऊस लागवडीस उशिरा प्रारंभ झाला आहे.

आषाढीवारी झाल्यानंतर सध्या पावसाने उघडीप दिल्याने शेतकरी शेतीकामात गुंतले आहेत. शेतकऱ्यांकडून शेतीच्या मशागतीसुरू होऊन उसाच्या लागवडी देखील सुरू करण्यात आले आहे. आडसाली, पूर्वहंगामी व सुरू ऊस अशा तीन टप्प्यांत उसाची लागवड केली जाते. शेतकरी साडेतीन फूट अंतरावरील सरी तसेच आधुनिक पट्टा पद्धतीने ऊस लागवडी करण्यावर भर देत आहेत. कोएम-86032, फुले-265 या ऊस बियाणांना लागवडीसाठी शेतकऱ्यांचे प्राधान्य दिसत आहे.

मागील वर्षी साखर कारखान्यांकडून उसाला प्रति टन 2800- 3200 रुपयापर्यंत बाजारभाव मिळाला आहे. चालू वर्षी उसाच्या बेण्याचे बाजारभाव 3500 रुपये प्रतिटन या दराने खरेदी करण्याची वेळ शेतकरी वर्गावर आली आहे.आता सुरू असलेल्या लागवडी कोरडीला सुरू आहे. मजूर प्रतिएकर लागवडीसाठी सहा हजार रुपये घेत आहेत. खताचा खर्च देखील वाढलेला आहे. एकूण उसाच्या उत्पन्नाचा खर्च वाढल्यामुळे तंत्रशुद्ध व अधिक उत्पादन कसे निघेल व अधिकचा नफा कसा मिळवता येईल यावर शेतकऱ्यांनी भर देत आहेत. आडसाली, पूर्वहंगामी व सुरू ऊस अशा तीन टप्प्यांत उसाची लागवड केली जाते. शेतकरी साडेतीन फूट अंतरावरील सरी तसेच आधुनिक पट्टा पद्धतीने ऊस लागवडी करण्यावर भर देत आहेत



### बळीराजा एआय वापरण्याच्या तयारीत

» काही शेतकरी रोपवाटिकेतून उसाचे रोप आणून लागवड करत आहेत आणि एआय पद्धतीने ऊस उत्पादन घेण्याच्या तयारीत आहेत. शेतकऱ्यांकडून लागवड करताना पट्टा पद्धतीने लागवड करण्यावर विशेष भर दिला जात आहे. यामध्ये सरींमध्ये साडेतीन फूट तर दोन पट्ट्यातील अंतर हे साडेचार फूट ठेवण्यात येत आहे. एआय तंत्रज्ञानाचा शेती क्षेत्रात वाढता प्रभाव लक्षात घेता अत्याधुनिक पद्धतीने शेती करणारे अनेक शेतकरी उसाच्या शेतीमध्ये हे तंत्रज्ञान वापराच्या तयारीत आहेत.